दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - २ | अंक - १६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

दिनांक: ९ ऑक्टोबर २०२६ वार: शुक्रवार अयन: दक्षिणायन ऋतू: शरद मास (अमावस्यांत): भाद्रपद मास (पूर्णिमांत): आश्विन तिथी, नक्षत्र व योग तिथी: कृष्ण चतुर्दशी (रात्री ९:३५ पर्यंत, त्यानंतर अश्विन अमावस्या सुरू) नक्षत्र: उत्तरा फाल्गुनी योग: ब्रह्म योग सूर्य आणि चंद्र वेळ (साधारण संदर्भ) सूर्योदय: सकाळी ६:१८ च्या सुमारास सूर्यास्त: संध्याकाळी ५:५८ च्या सुमारास चंद्रोदय: पहाटे ४:५३ च्या सुमारास (१० ऑक्टोबर पहाटे) चंद्रास्त: दुपारी ४:५९ च्या सुमारास

### नानाची वाडी झाली सुन्न!

**पुणे :** सिंहगडावरुन खडकवासला धरणाकडे गेलेल्या डोंगररांगेच्या पायथ्याशी पायगुडेवाडी आहे. याच वाडीतील 'नानाची वाडी' हे प्रसिद्ध अभिनेते पद्मश्री पुरस्कार प्राप्त 'नाना' पाटेकर यांचे फार्महाऊस. नातेवाईक, मित्र आणि परिचितांच्या वर्दळीने नेहमी गजबजलेली ही वाडी नानांच्या उपस्थितीने चैतन्यमय असायची. मात्र, आज याच वाडीवर शोककळा पसरली होती. नानांच्या निधनाची वार्ता समजताच पायगुडेवाडी परिसरातील ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त झाली.

# नटसम्राटाची महाएक्झिट

## नाना पाटेकर काळाच्या पडद्याआड; अभिनय आणि माणुसकीचा वादळी अध्याय शांत!



■ पुणे : जनमंथन वृत्तसेवा

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टी आपल्या अंगावरच्या अफाट अभिनयाने हादरवून सोडणारे, संवादाच्या प्रत्येक श्वासावर रसिकांच्या काळजाचा ठोका चुकवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे आज गोव्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या ७५ व्या वर्षी अकाली निधन झाले. त्यांच्या निधनाने कलासृष्टी आणि सामाजिक क्षेत्रावर एक शांत, नि:शब्द करणारी शोककळा पसरली आहे. पडद्यावरचा तो रुबाबदार, कडाडणाऱ्या विजेसारखा आक्रमक चेहरा आणि दुसरीकडे 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त बळीराजाचे अश्रू पुसणारा अत्यंत हळवा, संवेदनशील माणुसकीचा झरा या दोन्ही रूपांचा मेळ म्हणजे नाना पाटेकर.

गोव्यातील डोना पावलामधील घरी असताना त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना तातडीनं मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान, त्यांची प्राणज्योत मालवली. नाना पाटेकर यांनी आपल्या कारकिर्दीत विविधांगी भूमिका साकारत अभिनयाची वेगळी छाप निर्माण केली. त्यांच्या अभिनयामुळे त्यांनी चित्रपटसृष्टीत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते. नाना पाटेकर यांच्या निधनाने मनोरंजनसृष्टीसह सामाजिक क्षेत्रातूनही हळहळ व्यक्त केली जात आहे.

**नाम फाऊंडेशनचा आधार हरपला**

नाना पाटेकर यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यामातून सामाजिक कार्य हाती घेतलं होतं. २०१५ मध्ये नाना पाटेकर आणि अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी नाम फाऊंडेशची सुरूवात केली. फाऊंडेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी आणि शेतकरी कुटुंबांना आर्थिक व सामाजिक मदत केली जात असे. तसंच दुष्काळग्रस्त भागात जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाची कामे देखील ही संस्था करत असे. नानांच्या निधनामुळे नाम फाऊंडेशनचा आधार हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

नानांनी प्रेक्षकांना हसवले, रडवले आणि विचार करायला लावले. त्यांच्या अभिनयात जी एक विलक्षण जिद्द आणि निष्ठा होती, ती आजच्या काळात दुर्मिळच. रंगभूमीवरून सुरु झालेला हा प्रवास चित्रपटसृष्टीच्या माथ्यावरचा मुकुटमणी ठरला. परंतु काळाचा महिमा अगाध आहे. ज्या माणसाने आयुष्यभर संवादाच्या जोरावर लक्षावधी माणसांच्या हृदयावर राज्य केले, त्याच हृदयाने आज अचानक साथ सोडली.

एका महान कलावंताची आणि तितक्याच मोठ्या मनाच्या निष्ठावंत माणसाची ही अचानक झालेली गळती मनाला खोलवर चटका लावून जाणारी आहे.

## एसआयआर प्रकरणात माजी न्यायमूर्तींचा आवाज न्यायालय ऐकणार का?; मतदारांच्या हक्कांवर परिणाम होत असेल तर 'मूळ नोंदी' तपासणे गरजेचे

### माजी न्यायमूर्ती व्ही. गोपाला गौडा यांची मागणी; निवडणूक आयोगाने एसआयआर चा निर्णय पूर्ण आयोगाच्या बहुमताने घेतला होता का, याची सर्वोच्च न्यायालयाने खातरजमा करावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला (एसआयआर ) मंजुरी देताना सर्वोच्च न्यायालयासमोर निवडणूक आयोगाने वस्तुस्थिती चुकीच्या पद्धतीने मांडली असेल, तर त्या निर्णयाची पुन्हा तपासणी करणे ही केवळ न्यायालयीन प्रक्रिया नसून लोकशाहीतील मतदारांच्या अधिकारांशी संबंधित बाब ठरते. त्यामुळे एसआयआर संदर्भातील मे २०२६ मधील निर्णयाचा सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून पुनर्विचार करावा, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. गोपाला गौडा यांनी केली आहे.

'लाइव्ह लॉ'शी बोलताना न्यायमूर्ती गौडा यांनी एसआयआर लागू करण्याचा निर्णय नेमका कसा घेण्यात आला, याची संपूर्ण नोंद न्यायालयाने निवडणूक आयोगाकडून मागवावी, अशी भूमिका मांडली. हा निर्णय भारताच्या संपूर्ण निवडणूक आयोगाने सामूहिकरीत्या घेतला होता का, सर्व निवडणूक आयुक्तांची त्याला संमती होती का आणि निर्णय बहुमताने झाला होता का, याची खातरजमा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

एखाद्या निर्णयाचा थेट परिणाम नागरिकांच्या मताधिकारावर होत असेल, तर त्या निर्णयामागील प्रक्रिया पारदर्शक होती का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे एसआयआर च्या निर्णयाशी संबंधित बैठकींचे इतिवृत्त, नोंदी, पत्रव्यवहार आणि निर्णयप्रक्रियेतील अधिकृत कागदपत्रे न्यायालयाने मागवून तपासावीत, अशी मागणी पुढे आली आहे.

न्यायमूर्ती गौडा यांच्या म्हणण्यानुसार, न्यायालयासमोर मांडलेली माहिती आणि प्रत्यक्ष निर्णयप्रक्रिया यामध्ये विसंगती आढळल्यास आधीच्या न्यायालयीन निर्णयाचा पुनर्विचार होऊ शकतो. न्यायालयासमोर चुकीची माहिती सादर झाली असल्याचे सिद्ध झाले, तर त्या माहितीच्या आधारावर दिलेल्या आदेशाच्या वैधतेचा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. एसआयआरच्या व्यापक परिणामांच्या पार्श्वभूमीवर माजी न्यायमूर्तींनी उपस्थित केलेले प्रश्न न्यायालयाने केवळ व्यक्तीचे मत म्हणून बाजूला न ठेवता, त्यामागील तथ्यांची स्वतंत्रपणे पडताळणी करावी का, हा आता चर्चेचा मुद्दा आहे.

मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळली जाण्याची शक्यता असल्यास त्याचा परिणाम थेट सामान्य नागरिकाच्या मतदानाच्या अधिकारावर होऊ शकतो. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेची शुचिता आणि मतदाराचा घटनात्मक अधिकार यापैकी कोणत्याही बाबतीत शंका निर्माण होत असेल, तर न्यायालयाने मूळ नोंदी तपासणे हे न्यायिक औचित्याच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही का?

## शेतकरी प्रश्नांवर किसान सभेचा एल्गार; अकोल्यातून मुंबईकडे शेकडो वाहनांचा लाँग मार्च

■ दैनिक राज्य लोकतंत्र

कोल्हापूर । प्रतिनिधी

दुष्काळाने होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेने राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. कर्जमाफी, आर्थिक मदत, पीक विमा, देवस्थान इनाम वर्ग-३, वनजमीन, गायरान आणि वरकस जमिनींच्या प्रश्नांवर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

कोल्हापूर येथे झालेल्या किसान सभेच्या २४व्या राज्य अधिवेशनात आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या अधिवेशनात राज्यभरातील ३०६ प्रतिनिधी सहभागी झाले.

१५ ऑक्टोबरला अकोले येथे भव्य मोर्चा काढण्यात येणार असून, २१ ऑक्टोबरपासून महामुक्काम आंदोलन सुरू होईल. २२ ऑक्टोबरला कॉ. वृंदा करात, डॉ. अशोक ढवळे, माजी आमदार जे. पी. गावित आणि आमदार विनोद निकोले आंदोलनाला संबोधित करणार आहेत.

सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास २६ ऑक्टोबरला अकोले येथून शेकडो वाहनांचा लाँग मार्च मुंबईच्या दिशेने निघेल. २७ ऑक्टोबरला मुंबईत पोहोचल्यानंतर बेमुदत महामुक्काम करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पदरात घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष मदत पडावी, यासाठी आता रस्त्यावर उतरण्याचा निर्धार किसान सभेने केला आहे.

## एसआयआरच्या वादात इंडिया आघाडी राष्ट्रपतींच्या दरबारात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी



मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (एसआयआर) प्रक्रियेवरून सुरू असलेला राजकीय संघर्ष आता राष्ट्रपती भवनापर्यंत पोहोचला आहे. इंडिया आघाडीचे दहा खासदार आणि प्रमुख नेते शुक्रवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि एसआयआर प्रक्रियेतील कथित अनियमितता हे या भेटीतील प्रमुख मुद्दे असण्याची शक्यता आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्यासह प्रमुख नेते शिष्टमंडळात असण्याची शक्यता आहे.

इंडिया आघाडीने सुरुवातीला १५ नेत्यांच्या शिष्टमंडळासाठी राष्ट्रपतींकडे वेळ मागितली होती. मात्र, राष्ट्रपती भवनाने दहा सदस्यांची मर्यादा निश्चित केली.

२ ऑक्टोबरला पहिल्यांदा भेटीसाठी पत्र देण्यात आले. त्यानंतर ५ ऑक्टोबरला ७, ८ किंवा ९ ऑक्टोबरपैकी कोणत्याही दिवशी वेळ देण्याची विनंती करण्यात आली. आता शुक्रवारी भेट निश्चित झाली आहे.

एसआयआरवरून विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत असताना राष्ट्रपतींकडे मांडण्यात येणाऱ्या भूमिकेला राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे.

## 'एपीआयच्या मालकीची मर्सिडीज?'; सचिन वाझे प्रकरणात हायकोर्टाचे पोलिसांवर ताशेरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी



बडतर्फ सहायक पोलीस निरीक्षक सचिन वाझे यांच्या मालमत्ता आणि वाहनांवरून मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी गंभीर प्रश्न उपस्थित केले. 'एका एपीआयच्या मालकीची मर्सिडीज असणे ही पोलीस आयुक्तांसाठी चिंतेची बाब असायला हवी,' अशा शब्दांत न्यायालयाने सवाल केला.

सचिन वाझे यांच्या जामीन अर्जावर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुमारे तीन तास सुनावणी झाली.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने वाझे यांचा मासिक पगार किती होता, अशी विचारणा केली. त्यावर त्यांना सध्या दरमहा सुमारे ९० हजार रुपये वेतन मिळत असल्याचे वकिलांनी सांगितले.

एका साक्षीदाराच्या जबाबाचा संदर्भ देताना न्यायालयाने वाझे मर्सिडीजमधून पोलीस आयुक्त कार्यालयात तसेच वर्षा बंगल्यावर जात असल्याचा उल्लेख केला. एका पोलीस अधिकाऱ्याच्या उत्पन्नाच्या तुलनेत अशा महागड्या वाहनाचा संबंध संशय निर्माण करणारा ठरू शकतो, असे न्यायालयाच्या प्रश्नांतून स्पष्ट झाले.

अँटिलिया बॉम्बप्रकरण आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणातील आरोपी असलेले वाझे सध्या तळोजा कारागृहात आहेत. त्यांच्या जामीन अर्जावरील सुनावणीत न्यायालयाच्या प्रश्नांमुळे आर्थिक व्यवहार आणि मालमत्तेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## आंदोलनजीवी' शब्द सरकारी आदेशात आला कुठून?; न्यायालयाचा सवाल, सरकारी भाषेच्या राजकीयीकरणावर प्रश्नचिन्ह

### एनएसए स्थानबद्धतेच्या कारणपत्रात शब्दाचा वापर; 'अधिकृत दस्तऐवजात अशी राजकीय छटा असलेली भाषा कशी आली?' अलाहाबाद उच्च न्यायालयाची सरकारला विचारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

प्रयागराज । वृत्तसंस्था

राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत एखाद्या नागरिकाला स्थानबद्ध करण्यासाठी जारी केलेल्या अधिकृत आदेशात 'आंदोलनजीवी' या शब्दाचा वापर झाल्याने अलाहाबाद उच्च न्यायालयाने सरकारला थेट सवाल केला आहे. कायदेशीर दस्तऐवजाची भाषा वस्तुनिष्ठ, अचूक आणि कायद्याच्या चौकटीत असणे अपेक्षित असताना, राजकीय किंवा वैचारिक छटा असलेली संज्ञा सरकारी आदेशात आलीच कशी, हा न्यायालयाचा प्रश्न या प्रकरणाला अधिक व्यापक संदर्भ देणारा ठरला आहे.

न्यायमूर्ती अतुल श्रीधरन आणि न्यायमूर्ती अचल सचदेव यांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारचे अतिरिक्त महाधिवक्ता मनीष गोयल यांच्याकडे याबाबत स्पष्टीकरण मागितले. हा शब्द आला कुठून? अधिकृत सरकारी दस्तऐवजात तो कसा आला? असा सवाल न्यायमूर्ती अतुल श्रीधरन यांनी केला.

नोएडाच्या जिल्हाधिकारी मेधा रूपम यांनी जारी केलेल्या स्थानबद्धता आदेशाचा आधार असलेल्या कारणपत्रात 'आंदोलनजीवी' हा शब्द वापरण्यात आला आहे. पत्रकार सत्यम वर्मा यांना एप्रिल २०२६मध्ये नोएडा येथे झालेल्या कामगार आंदोलनातील कथित भूमिकेच्या आधारे एनएसए अंतर्गत स्थानबद्ध करण्यात आले आहे. या कारवाईला वर्मा यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

कायदेशीर आदेशात राजकीय शब्दावली का?

या सुनावणीचे महत्त्व केवळ एका शब्दापुरते मर्यादित राहत नाही. एखाद्या व्यक्तीविरुद्ध राष्ट्रीय सुरक्षा कायद्यासारख्या कठोर कायद्याचा वापर करताना प्रशासनाने मांडलेली कारणे स्पष्ट, विशिष्ट आणि कायदेशीर कसोटीवर टिकणारी असणे अपेक्षित असते. अशा दस्तऐवजात एखाद्या व्यक्तीला विशिष्ट राजकीय किंवा आंदोलनाशी संबंधित ठपका देणारी संज्ञा वापरली गेल्यास, त्या भाषेमागील आधार काय, हा प्रश्न निर्माण होतो.

विशेषतः 'आंदोलनजीवी' हा शब्द सरकारी यंत्रणेच्या अधिकृत कायदेशीर शब्दसंग्रहाचा भाग आहे का, की तो सार्वजनिक आणि राजकीय चर्चेतून प्रशासनाच्या दस्तऐवजापर्यंत पोहोचला? हा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केल्याने प्रशासनाच्या भाषेच्या वस्तुनिष्ठतेवरही चर्चा सुरु झाली आहे.

गेल्या काही वर्षांत सार्वजनिक आणि राजकीय चर्चेत विशिष्ट विचारसरणीशी जोडलेले शब्द मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहेत. मात्र, राजकीय भाषणातील शब्द आणि न्यायालयीन किंवा प्रशासकीय आदेशातील शब्द यांच्यात मूलभूत फरक असतो. सरकारी यंत्रणेचा दस्तऐवज हा एखाद्या नागरिकाच्या स्वातंत्र्यावर परिणाम करू शकतो. त्यामुळे त्यातील प्रत्येक शब्दाला कायदेशीर अर्थ आणि परिणाम असतो. मोदी सरकारच्या काळात प्रशासन, राजकारण आणि सार्वजनिक चर्चेतील भाषेच्या सीमारेषा अधिक धूसर झाल्याची टीका विविध स्तरांतून होत असली, तरी या प्रकरणात न्यायालयाने उपस्थित केलेला प्रश्न त्यापेक्षा मूलभूत आहेसरकारी कागदपत्रात व्यक्तीविषयीची भाषा राजकीय ठपक्याऐवजी कायदेशीर तथ्यांवर आधारित असायला नको का? 'आंदोलनजीवी' हा शब्द स्वतःमध्ये गुन्ह्याचे किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण केल्याचे कोणतेही कायदेशीर प्रमाण ठरत नाही. त्यामुळे एनएसए सारख्या कठोर कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचे समर्थन करण्यासाठी वापरलेल्या कारणपत्रात अशा शब्दाचा नेमका काय संदर्भ आणि कायदेशीर आधार आहे, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, वर्मा यांच्या याचिकेवर न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून निकाल राखून ठेवला आहे. ७ आणि ८ ऑक्टोबर रोजी सलग दोन दिवस सुनावणी झाली.

या प्रकरणाचा अंतिम निर्णय काहीही असो; मात्र न्यायालयाने सरकारी दस्तऐवजातील एका शब्दावर घेतलेली गंभीर दखल लोकशाहीतील एक महत्त्वाचा प्रश्न पुढे आणतेसत्तेची भाषा सरकारी आदेशाची भाषा बनली, तर कायद्याच्या निष्पक्षतेवर सामान्य नागरिकाने विश्वास ठेवायचा तरी कसा?

## संपादकीय

### मेक इन इंडिया' की 'मित्रभांडवलशाही'? मस्क यांच्या आरोपांमुळे मोदी धोरणांचे वस्त्रहरण

जागतिक स्तरावर तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचा महामार्ग भारतात आणण्याचे दावे करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार सध्या एका मोठ्या जागतिक वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. अब्जाधीश उद्योगपती आणि स्पेसएक्स (डरिलशद) चे प्रमुख इलॉन मस्क यांनी भारताच्या सॅटलाईट इंटरनेट (ड्रींले) क्षेत्रात प्रवेश करण्यास होत असलेल्या विलंबावरून थेट देशातील ''काही धनिकांवर'' (जश्रळसरॲलही) आणि अप्रत्यक्षपणे सरकारी यंत्रणेवर गंभीर आरोप केले आहेत. भारताच्या ग्रामीण आणि दुर्गम भागातील जनतेला डिजिटल क्रांतीपासून दूर ठेवणे हा एक ''गुन्हेगारी स्वरूपाचा कट'' आहे, असे मस्क यांनी म्हटले आहे. मस्क यांच्या या 'ओलिगार्की' (धनिकशाही) च्या दाव्यानंतर केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने हे आरोप फेटाळले असले तरी, या वादाने मोदी सरकारच्या 'इझ ऑफ डुइंग बिझनेस', 'मेक इन इंडिया' आणि जागतिक गुंतवणूक धोरणांचे वस्त्रहरण केले आहे.

**'गुंतवणूक मित्र' प्रतिमेला बसलेला धक्का**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने आंतरराष्ट्रीय मंचांवरून टेस्ला आणि स्टारलिंक सारख्या जागतिक कंपन्यांना भारतात येण्यासाठी पायघड्या घातल्या आहेत. मात्र, गेल्या चार ते पाच वर्षांपासून स्टारलिंक केवळ परवाने आणि मंजुरीच्या फाईल्समध्ये अडकून पडली आहे. मस्क यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा भारतातील नोकरशाही आणि प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवणारा आहे. जर जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तीला भारतात व्यापार सुरू करण्यासाठी एवढा संघर्ष करावा लागत असेल, तर इतर परदेशी गुंतवणूकदारांचे काय होत असेल, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. मस्क यांचे हे थेट आरोप मोदी सरकारच्या त्या जाहिरातबाजीला धक्का देणारे आहेत, ज्यामध्ये भारत हा परदेशी गुंतवणुकीसाठी सर्वात सुलभ देश असल्याचे सांगितले जाते.

**क्रोनी कॅपिटलिझम (मित्रभांडवलशाही) ची सावली**

मस्क यांनी लावलेला 'ओलिगार्की' हा शब्द थेट भारतीय उद्योग जगतातील मक्तेदारीकडे (चेपेंश्रिळीींळल उहेझशहेश्रव) निर्देश करतो. भारतातील दूरसंचार (ढशश्रशले) क्षेत्र सध्या रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल या दोनच बड्या कंपन्यांच्या हातात एकवटलेले आहे, ज्यांचा बाजारपेठेवर ८० टक्क्यांहून अधिक ताबा आहे. मस्क यांच्या आरोपांमुळे विरोधकांच्या त्या दाव्याला बळ मिळाले आहे, ज्यानुसार मोदी सरकार केवळ आपल्या मर्जीतील ठराविक बड्या कॉर्पोरेट मित्रांच्या व्यावसायिक हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी कायदे आणि नियम वाकवत आहे. सॅटलाईट स्पेक्ट्रमच्या लिलावाबाबत (र्अीलींळेप) जिओ आणि एअरटेलने घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्यानंतर स्टारलिंकच्या मंजुरीला झालेली दिरंगाई, हे दर्शवते की देशांतर्गत कॉर्पोरेट दबावापुढे सरकार झुकत आहे.

सरकारी सूत्रांनुसार, स्टारलिंकला राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव अडवण्यात आले आहे, कारण यापूर्वी अंदमान आणि मणिपूरमध्ये काही अनधिकृत स्टारलिंक उपकरणे सापडली होती. परंतु, स्टारलिंकच्या बिझनेस ऑपरेशन्सच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रायर यांनी 'इंडिया मोबाईल काँग्रेस २०२६' मध्ये स्पष्ट केले की, त्यांनी भारताच्या सुरक्षेचे सर्व नियम पाळून २० गेटवे साईट्स उभारल्या आहेत आणि भारतीय युजर्सचा डेटा भारतातच राहील अशी व्यवस्था केली आहे. तरीही अंतिम मंजुरी न मिळणे हे संशयास्पद आहे. जेव्हा देशांतर्गत कंपन्यांच्या सॅटलाईट सेवांचा प्रश्न येतो, तेव्हा नियमांची गती वेगळी असते आणि परदेशी स्पर्धकाचा प्रश्न येतो, तेव्हा सुरक्षेचे कारण पुढे करून प्रक्रिया लांबवली जाते, हा तथ्यपूर्ण विरोधाभास मोदी सरकारच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभा करतो. मोदी सरकार 'डिजिटल इंडिया'चा मोठा गाजावाजा करते, परंतु वास्तव हे आहे की मे २०२६ पर्यंत भारतातील ११,२५६ हून अधिक गावांमध्ये अजूनही ४जी कनेक्टिव्हिटी पोहोचलेली नाही. ग्रामीण भागात इंटरनेटची घनता शहरी भागाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. स्टारलिंकसारखे सॅटलाईट इंटरनेट दुर्गम भागात स्वस्त आणि वेगवान इंटरनेट देऊ शकते, जे पारंपरिक टॉवर्सच्या माध्यमातून शक्य नाही.

मात्र, अंतर्गत कंपन्यांची मक्तेदारी टिकवून ठेवण्याच्या नादात सामान्य भारतीय ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवले जात आहे. मस्क विरुद्ध मोदी सरकार हा वाद केवळ एका परदेशी कंपनीच्या परवान्यापुरता मर्यादित नाही. हा वाद भारताच्या आर्थिक धोरणांमधील प्रामाणिकतेचा आहे. एकीकडे मस्क यांना भारतात आणण्यासाठी आतुर असलेले पंतप्रधान मोदी आणि दुसरीकडे देशांतर्गत बड्या कॉर्पोरेट मित्रांचे व्यावसायिक साम्राज्य वाचवण्याची धडपड, या दुटप्पी भूमिकेमुळे भारताची जागतिक पत घसरत आहे. राष्ट्रीय सुरक्षेचा आडोसा घेऊन जर मित्रभांडवलशाहीचे रक्षण केले जात असेल, तर ते 'मेक इन इंडिया'च्या मूळ संकल्पनेचा पराभव करणारे आहे. सरकारने आपल्या धोरणांमध्ये पारदर्शकता आणून ही कोंडी फोडण्याची तातडीने गरज आहे.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहात लोककला, बालरंगभूमी आणि संगीताची सुरेल मैफल

## 'मराठी लावणी'पासून 'स्वरशांता'पर्यंत; शाहिरी पोवाडे आणि बालनाट्याला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

मराठी भाषेची समृद्ध परंपरा, साहित्य, लोककला, संगीत आणि रंगभूमीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मैफल रंगली. मराठी लावणी, बालनाट्य, कवयित्री शांता शेळके यांच्या गीतांचा 'स्वरशांता' कार्यक्रम आणि शाहिरी पोवाड्यांच्या माध्यमातून मराठीच्या विविध कलारूपांचा अनुभव रसिकांना मिळाला.

**महिलांसाठी 'मराठी लावण्यां'चा ठसकेबाज आविष्कार**

सांगवी येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिरात महिलांसाठी खास 'मराठी लावण्यां'चा कार्यक्रम झाला. लावणीतील ठसका, नजाकत, अभिनय, नृत्य आणि ताल यांचा सुरेख मिलाफ महिला कलाकारांनी सादर केला. कलाकारांच्या सादरीकरणाला दाद देतानाच महिला रसिकांनीही तालावर ठेका धरत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पारंपरिक गण, मुजरा आणि गवळणीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या माया खुटेगांवकर यांनी 'विचार काय हाय तुमचा ओ पाव्हणं' या लावणीद्वारे दमदार अदाकारी सादर केली. दोन बालगंधर्व पुरस्कार तसेच विठाबाई भाऊमांग पुरस्काराने सन्मानित अर्चना जावळेकर यांनी 'या रावजी बसा भावजी' या लोकप्रिय लावणीद्वारे अभिनय आणि नृत्याचा सुरेख आविष्कार घडविला.

नमिता पाटील यांनी 'आजकाल पाटलांचा लय रुबाब बाई लय रुबाब', प्राची मुंबईकर यांनी 'कुण्या गावचं आलं पाखरू', तर पूजा विडकर आणि अस्मिता पुणेकर यांनी 'कुठं कुठं जायचं हनिमूनला' या लावण्यांचे सादरीकरण केले. गायक स्वप्नील गायकवाड यांनी 'पाटलांचा बैलगाडा' हे गीत सादर केले. कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक समीर सूर्यवंशी, नियोजक स्मिता देशमुख व वैजयंती भालेराव आणि निवेदक राम दत्तकला यांनी जबाबदारी सांभाळली.

**'ग्रीझीच्या दुनियेत चिंटूची धमाल'ने बालरंगभूमीचा अनुभव**

महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आचार्य अत्रे रंगमंच येथे 'ग्रीझीच्या दुनियेत चिंटूची धमाल' या बालनाट्याचे सादरीकरण झाले. विनोदी प्रसंग, गाणी, नृत्य आणि कल्पनारम्य कथानकामुळे विद्यार्थ्यांनी नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रंगीत नेपथ्य, आकर्षक वेशभूषा आणि प्रकाशयोजनेने नाटकाचे कल्पनाविश्व प्रभावी केले. मनोरंजनासोबतच विद्यार्थ्यांना समूहाने नाटक पाहण्याचा आणि मराठी रंगभूमीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

चिंचवड येथे १९८७ मध्ये स्थापन झालेली 'कादंबरी प्रोडक्शन हाऊस' गेल्या चार दशकांपासून बालनाट्य क्षेत्रात कार्यरत असून, संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे साडेतीन हजार बालनाट्यांचे प्रयोग सादर करण्यात आल्याची माहिती संस्थेचे प्रमुख प्रा. नितीन कुमार यांनी दिली.

**शांता शेळकेंच्या शब्दांना सुरांची साथ; 'स्वरशांता'ची भावस्पर्शी मैफल**

नटसम्राट निळू फुले रंगमंदिरात कवयित्री शांता शेळके यांच्या गीतांवर आधारित 'स्वरशांता' हा संगीत कार्यक्रम झाला. मंजुश्री दिवाण यांच्या संकल्पना व सादरीकरणातून साकारलेल्या या कार्यक्रमात शांता शेळके यांच्या शब्दप्रतिभेला सुरांचा साज चढविण्यात आला. शुभदा दामले आणि विशाखा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

'गणराज रंगी नाचतो' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर 'जय शारदे', 'ही वाट दूर जाते', 'ऋतू हिरवा, ऋतू बरवा', 'घनराणी', 'हे श्याम सुंदर', 'पुनवेचा चंद्रमा आला घरी', 'वादळ वारं सुटलं', 'काटा रुते कुणाला', 'शालू हिरवा', 'माजे राणी माजे मोगा', 'काय बाई सांगू, कसं गं सांगू', 'शारदा सुंदर चंदेरी राती' आणि 'मनाच्या धुंदीत लहरीत ये ना' अशा गीतांनी मैफल रंगली.

बालगीते, चित्रपटगीते, भावगीते, कोळीगीते, नाट्यगीते आणि कोकणी गीतांमधून शांता शेळके यांच्या लेखणीचे विविध पैलू उलगडले. मंजुश्री दिवाण यांच्या शिष्यांनी भावपूर्ण गायन आणि स्पष्ट शब्दोच्चारातून प्रत्येक गीताला स्वतंत्र रंग दिला. 'मराठी पाऊल पडते पुढे' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**'जागर मराठीचा गजर शाहिरीचा'मधून इतिहासाचा जागर**

महाराष्ट्र शाहीर परिषद यांच्या सहकार्याने 'शाहिरी पोवाडा, जागर मराठीचा गजर शाहिरीचा' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. संत, शूरवीर आणि महापुरुषांच्या पराक्रमाचा इतिहास पारंपरिक शाहिरी पोवाड्यांच्या माध्यमातून रसिकांसमोर उलगडण्यात आला. एकूण १५ पारंपरिक आणि स्फूर्तीदायक रचनांचा यावेळी आविष्कार झाला.

गण आणि शिवरायांना अर्पण केलेल्या मुजऱ्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर शिवजन्मपूर्व महाराष्ट्र, शिवजन्म आणि स्वराज्यनिर्मितीचा संघर्ष उलगडणारे पोवाडे सादर करण्यात आले. वासुदेवाच्या सादरीकरणातून लोकसंस्कृतीचे दर्शन, तर 'महाराष्ट्र कुलस्वामिनी' या जोगव्यातून भक्तिभावाचा आविष्कार घडला.

'चमके शिवशाही तलवार', 'शिवबाचे मावळे' आणि 'छत्रपती शिवरायांचा विचार जयजयकार' या सादरीकरणांतून स्वराज्य, मावळ्यांचा त्याग आणि शिवरायांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वीर बाजीप्रभूंच्या पराक्रमावरील पोवाडा, धनगरी गीत, संयुक्त महाराष्ट्र गोंधळ आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 'माझी मैना गावाकडे राहिली' या लावणीचेही सादरीकरण झाले.

शाहीर प्रकाश ढवळे, बाळासाहेब माळुसकर, चैतन्य आजरुडकर, रामरत्न पाडगळ, अभिजित काळोखे, ऋषिकेश मिनिकराव, मनिषा मोहिते, स्मिता बोरीवकर, कांचन शास्त्री, चित्रा कुलकर्णी, अभय मोरे, आरिफा पठाण आणि अनिकेत सोनकांबळे यांनी दमदार सादरीकरण केले.

बाळशाहीर अथर्व गायकवाड याच्या बालवयातील सादरीकरणालाही रसिकांची विशेष दाद मिळाली. महाराष्ट्र पोवाडा आणि 'गर्ज हे हिंद भूमी' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

अभिजात मराठी भाषा सप्ताहातील या कार्यक्रमांमधून मराठीचा साहित्यिक वारसा लोककला, संगीत, नाट्य आणि शाहिरी परंपरेशी जोडला गेला. विविध वयोगटांतील नागरिक आणि विद्यार्थ्यांना मराठीच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा प्रत्यक्ष कलानुभव देणारे हे कार्यक्रम सप्ताहाच्या उद्देशाला व्यापक स्वरूप देणारे ठरले.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहात नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**




ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे आयोजित कार्यक्रमात नाना पाटेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, गझलगायक आशिष मुजुमदार, ग्रंथालय प्रमुख प्रतिभा मुनावत, ग्रंथपाल राजू मोहन, प्रवीण चाबुकस्वार, वर्षा जाधव, निदेशक रवींद्र ओव्हाळ, योगिता कोठावदे, बबिता गावंडे, व्ही. आर. कुंभार, शिक्षक गणेश लिंगडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

नाना पाटेकर यांनी मराठी रंगभूमीपासून अभिनयाच्या प्रवासाला सुरुवात करत मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची स्वतंत्र ओळख निर्माण केली. विविध भूमिका प्रभावीपणे साकारत त्यांनी रंगभूमी, चित्रपट आणि कलाक्षेत्रावर ठसा उमटविला. अभिनयातील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

कलाक्षेत्रासोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांत योगदान दिले. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीशी असलेल्या त्यांच्या नात्याचे स्मरण करत उपस्थितांनी नाना पाटेकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमी, चित्रपटसृष्टी आणि व्यापक कलाक्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त केली.

'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'च्या कार्यक्रमात नाना पाटेकर यांच्या कलाप्रवासाला उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# मराठवाड्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना राज्य सरकारकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी सुरू

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यानंतर आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा सुरू केला आहे. लोहा तालुक्यातील सोनखेड येथे त्यांनी सकाळी शेतपिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

या संवादादरम्यान एका शेतकऱ्याने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आठवण काढत, 'आज दादा असायला हवे होते. आतापर्यंत मदत मिळाली असती,' अशी भावना सुनेत्रा पवार यांच्यासमोर व्यक्त केली. अजित पवार प्रत्येक वेळी या भागातून जाताना शेतकऱ्यांची भेट घेत असत, असेही या शेतकऱ्याने सांगितले.

शेतकऱ्याने अजित पवार यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना, आम्ही दादावर प्रेम करणारी माणसं आहोत, असे म्हटले. त्यावर सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या भावनांना प्रतिसाद देत, आम्हीही दादांसारखेच तुमच्यावर प्रेम करतोय. आता तुम्हाला काही दिवसांनी कळेल, असे सांगितले. दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करताना शेतकऱ्याने अजित पवार हे महाराष्ट्रातील कार्यक्षम नेते होते, असे सांगितले. कोरडा दुष्काळ जाहीर केला असता तर आतापर्यंत मदत मिळाली असती, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावर सुनेत्रा पवार यांनी राज्य सरकारकडून दुष्काळी परिस्थितीवर कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

# 'वाहनाचा दंड भरा' म्हणत बनावट संकेतस्थळ; भोसरीत तब्बल ९ लाख ९९ हजारांची ऑनलाइन फसवणूक

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**भोसरी । प्रतिनिधी**

वाहनावर दंड थकीत असल्याचा बनावट संदेश पाठवून नागरिकाला खोट्या संकेतस्थळावर नेण्यात आले. त्यानंतर बनावट 'एमपरिवहन' अर्जाच्या माध्यमातून भोसरीतील एका व्यक्तीच्या बँक खात्यातून तब्बल ९ लाख ९९ हजार ९७१ रुपये परस्पर वळते करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

विनायक शंकर पाटील यांना २ ऑक्टोबर रोजी त्यांच्या वाहन क्रमांकावर दंड थकीत असल्याचा संदेश आला. दंड न भरल्यास प्रकरण न्यायालयात पाठविले जाईल, असा धाक दाखवून संदेशातील संकेतस्थळ उघडण्यास सांगण्यात आले. संकेतस्थळ परिवहन विभागाचे असल्याचे भासवून बनावट 'एमपरिवहन' अर्ज उघडण्यास भाग पाडण्यात आले.

त्यानंतर पाटील यांच्या मोबाईलवर ओटीपीचे संदेश आले आणि काही मिनिटांत त्यांच्या आयसीआयसीआय बँक खात्यातून ॲक्सिस बँक खात्यात एकूण ९,९९,९७१ रुपये वळते झाले. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**हज यात्रेचे आमिष; ११ लाख घेतले, यात्रेलाच पाठवले नाही**

**काळेवाडी । प्रतिनिधी**

हज यात्रेसाठी मक्का-मदिना येथे पाठविण्याचे आमिष दाखवून एका प्रवाशाकडून ११ लाख रुपये उकळल्याचा प्रकार काळेवाडीत उघडकीस आला आहे. पैसे घेतल्यानंतर यात्रेची व्यवस्था न करता रक्कम परत करण्यासही टाळाटाळ केल्याप्रकरणी ट्रॅव्हल्स कंपनीशी संबंधित दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, अल-खलिफा टूर्स ॲंड ट्रॅव्हल्स कंपनीचे एजंट रियाज शेख आणि कंपनीचे प्रोप्रायटर अमीर सरदार शेख यांनी विश्वास संपादन केला. फिर्यादी आणि त्यांचे वडील यांना हज यात्रेसाठी मक्का-मदिना येथे पाठविण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यासाठी फिर्यादीकडून कंपनीच्या एचडीएफसी बँक खात्यात ११ लाख रुपये जमा करून घेण्यात आले.

मात्र, पैसे घेतल्यानंतर हज यात्रा घडवून आणली नाही. तसेच जमा केलेली रक्कम परत करण्यासही टाळाटाळ करण्यात आली. याप्रकरणी काळेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, रियाज शेख याला अटक करण्यात आली आहे.

**जमीन खरेदीच्या आमिषाने ८० लाखांचा गंडा; बनावट चेक अन् खोट्या व्यवहारांचे संदेश**

**काळेवाडी । प्रतिनिधी**

जमीन खरेदी करून भागीदारीत बांधकाम व्यवसाय सुरू करण्याचे आमिष दाखवून महिलेची आणि तिच्या पतीची ८० लाख ५३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार काळेवाडीत समोर आला आहे. या प्रकरणी समाधान पोपट गेजगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीला आरोपीने रहाटणी येथील पाच आर जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव दिला. जमीन खरेदीसाठी १ कोटी ८४ लाख रुपये लागणार असून, त्यातील ८० लाख ५३ हजार रुपये फिर्यादीने द्यावेत, तर उर्वरित रक्कम आपण भरणार असल्याचे आरोपीने सांगितले. दोघांच्या भागीदारीत 'पी की डेव्हलपर्स' नावाची संस्था सुरू करून बांधकाम करण्याचे आश्वासनही देण्यात आले.

विश्वास ठेवून फिर्यादीने आरटीजीएस, नेट बँकिंग आणि आयएमपीएसद्वारे रक्कम दिली. मात्र, जमीन खरेदीचे कोणतेही कागदपत्र दाखवण्यात आले नाही. पैसे परत मागितल्यावर आरोपीने खात्यात रक्कम नसतानाही चेक दिले. तसेच खोटे आयएमपीएस संदेश पाठवून दिशाभूल केल्याचा आरोप आहे.

**कंपनीतून ६४ बॉक्स चोरी; ट्रान्सपोर्ट चालक सीसीटीव्हीत कैद**

**म्हाळुंगे । प्रतिनिधी**

म्हाळुंगे येथील लुमॅक्स ऑटो टेक्नॉलॉजीज कंपनीतून काळ्या रंगाच्या मालाचे ६४ बॉक्स परस्पर घेऊन जाण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चोरी करताना संबंधित चालक सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने पोलिसांनी संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

४ ते ५ ऑक्टोबरदरम्यान कंपनीत ही चोरी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. 'पीसी इन्फिनो एससी-१२२० यूआर' नावाच्या काळ्या रंगाच्या मालाचे ६४ बॉक्स जाधव ट्रान्सपोर्टच्या मारुती सुपर कॅरी वाहनातून नेण्यात आले.

कंपनीच्या परवानगीशिवाय माल वाहनात भरून नेण्यात आल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आले. कंपनीच्या संमतीशिवाय स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी माल लंपास केल्याचा आरोप खंडू रोहिदास सूर्यवंशी याच्यावर करण्यात आला आहे. उत्तर महाळुंगे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

**पार्क केलेली ६५ हजारांची रिक्षा लंपास; कागदपत्रांसह वाहन चोरी**

**रावेत । प्रतिनिधी**

रस्त्याच्या कडेला पार्क केलेली ६५ हजार रुपये किमतीची ऑटोरिक्षा अज्ञात चोरट्याने लंपास केली. विशेष म्हणजे रिक्षेच्या डिक्कीत वाहनाची मूळ नोंदणी स्मार्टकार्ड आणि चालक परवाना स्मार्टकार्डही ठेवलेले होते.

७ ऑक्टोबर रोजी दुपारी बाराच्या सुमारास अशोका नर्सरी, जुन्या पुणे-मुंबई महामार्गाजवळ फिर्यादी शुभम राऊत यांनी त्यांची काळी-पिवळी ऑटोरिक्षा पार्क केली होती. काही वेळाने परत आल्यानंतर रिक्षा जागेवर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले.

एमएच १४ एलएस २३९६ क्रमांकाची ही रिक्षा अज्ञात चोरट्याने परस्पर चोरून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. रिक्षेच्या डिक्कीत आरटीओचे मूळ नोंदणी स्मार्टकार्ड तसेच रिक्षा चालविण्याचा परवाना स्मार्टकार्डही होता. रावेत पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जीएसटीत व्यापाऱ्यांना दिलासा; अटकेची मर्यादा पाच कोटी, परतावा दहा दिवसांत!

■ नवी दिल्ली । वृत्तसंस्था

जीएसटी व्यवस्थेतील कथित कडक कारवाईमुळे धास्तावलेल्या व्यापाऱ्यांना जीएसटी कौन्सिलच्या ५७व्या बैठकीत मोठा दिलासा देण्यात आला आहे. करचोरीप्रकरणी अटकेची मर्यादा एक कोटी रुपयांवरून पाच कोटी रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, जीएसटी परताव्याची प्रक्रिया १५ दिवसांऐवजी दहा दिवसांत पूर्ण करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

सध्याच्या व्यवस्थेत एक कोटी रुपयांपेक्षा जास्त करचोरी, बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट किंवा चुकीच्या पद्धतीने परतावा घेतल्यास आयुक्तांच्या मंजुरीने अटकेची कारवाई होऊ शकत होती. नव्या निर्णयामुळे छोट्या-मध्यम व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

परतावा लवकर मिळाल्याने व्यवसायाचे भांडवल अनावश्यक काळासाठी अडकून राहणार नाही. ई-कॉमर्सच्या माध्यमातून वस्तू विकणाऱ्या लहान करदात्यांसाठी नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जीएसटी नोटिसा आणि कायदेशीर प्रक्रियेसाठी देशभर समान निकष लागू करण्याची शिफारस झाल्याचे सांगितले.

दरवर्षी जीएसटी दरांबाबत स्वतंत्र विशेष बैठक घेण्याचा प्रस्तावही पुढे आला आहे. त्यामुळे करव्यवस्था अधिक सुसंगत आणि व्यापारीस्नेही करण्याचा प्रयत्न असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले.

# रानफुलांच्या रंगछटांनी बहरले पिंपरगणे; निसर्गप्रेमींना खुणावतेय हिरवाई

## डोंगररांगा, हिरवाई आणि रानफुलांची मनमोहक उधळण; पर्यटन विकासाची गरज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

सह्याद्रीच्या कुशीत आणि आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात वसलेले पिंपरगणे गाव सध्या निसर्गाच्या विविधरंगी छटांनी बहरले असून, निसर्गप्रेमी आणि पर्यटकांना आकर्षित करीत आहे. डोंगररांगांवर पसरलेली हिरवाई, शेतांच्या बांधांवर उमललेली पिवळी-जांभळी रानफुले आणि प्रदूषणमुक्त, शांत वातावरणामुळे पिंपरगणे परिसराने निसर्ग पर्यटनाचे मनोहारी रूप धारण केले आहे.

पावसाळ्यानंतरच्या आल्हाददायक वातावरणात पिंपरगणे परिसरातील डोंगरउतार आणि शेतांचे बांध विविधरंगी रानफुलांनी सजले आहेत. हिरव्यागार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर फुललेली ही रंगांची नक्षीदार चादर पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. स्वच्छ हवा, उंचच उंच डोंगररांगा, पारंपरिक शेती आणि शांत परिसरामुळे निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक या भागाकडे आकर्षित होत आहेत.





पिंपरगणे परिसरात निसर्ग पर्यटनाच्या मोठ्या शक्यता असून, त्याचे नियोजनबद्ध पद्धतीने संवर्धन व पर्यटन विकास केल्यास या भागाला आंबेगाव तालुक्यातील महत्त्वाचे निसर्ग पर्यटन केंद्र म्हणून विकसित करता येऊ शकते. त्यासाठी रस्ते, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, सुरक्षित पर्यटनस्थळे, माहितीफलक तसेच स्थानिक पातळीवरील मार्गदर्शक आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. पर्यटन विकासाला चालना मिळाल्यास स्थानिक युवकांना होमस्टे, स्थानिक खाद्यपदार्थ, मार्गदर्शक सेवा, हस्तकला आणि अन्य पर्यटनपूरक व्यवसायांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्याचबरोबर पिंपरगणेच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांना व्यापक ओळख मिळू शकते.

'पिंपरगणेला निसर्गाचे मोठे वरदान लाभले आहे. सध्या रानफुले आणि हिरवाईने परिसर अधिकच खुलून दिसत आहे. प्रशासन आणि पर्यटन विभागाने मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास पिंपरगणे हे आंबेगाव तालुक्यातील प्रमुख पर्यटन केंद्र बनू शकते. त्यातून गावातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या चांगल्या संधी मिळतील,' असे स्थानिक ग्रामस्थ भिमा गवारी यांनी सांगितले.

# शेतीपंपांचे वाइंडिंग चोरट्यांकडून लंपास; गोनवडी-कोलदरा परिसरात शेतकऱ्यांमध्ये भीती

## दहा दिवसांत अनेक मोटारी फोडल्या; नदीकाठच्या भागात रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

घोडेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गोनवडी-कोलदरा ग्रामपंचायत परिसरात गेल्या दहा दिवसांपासून शेतीपंपांच्या विद्युत मोटारी फोडून त्यातील तांब्याचे वाइंडिंग चोरून नेण्याचे प्रकार सुरू आहेत. चोरटे मोटारीतील महागडे वाइंडिंग काढून घेतल्यानंतर रिकाम्या मोटारी घटनास्थळीच सोडून पसार होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.



गोनवडी व कोलदरा परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना चोरट्यांनी लक्ष्य केले आहे. नदीकाठच्या भागात बसविलेल्या मोटारींचे वाइंडिंग चोरीला गेल्याने पिकांना पाणी देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच शेतमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी कर्ज काढून अथवा पदरमोड करून विद्युत मोटारी बसवल्या होत्या. मात्र, या मोटारींचे वाइंडिंग चोरीला गेल्याने त्यांच्यासमोर पुन्हा दुरुस्ती अथवा नवीन मोटार बसविण्याचा खर्च उभा ठाकला आहे.

'पुन्हा हजारो रुपये खर्च करून मोटार दुरुस्त केली किंवा नवीन मोटार बसवली आणि पुन्हा चोरी झाली तर काय करायचे?' असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. सततच्या चोरीच्या घटनांमुळे गोनवडी-कोलदरा परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी त्रस्त शेतकऱ्यांनी घोडेगाव पोलिस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र, पोलिसांकडून 'तपास सुरू आहे', एवढेच उत्तर मिळत असून चोरट्यांचा बंदोबस्त कधी होणार, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, नदीकाठच्या शेती परिसरात रात्रीची गस्त वाढवावी, चोरीच्या घटनांचा तातडीने तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा आणि शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान थांबवावे, अशी मागणी गोनवडी व कोलदरा येथील ग्रामस्थांनी केली आहे.

# मातीशी नाळ जोडलेला 'नटसम्राट' हरपला; नाना पाटेकर यांच्या निधनाने मनाला चटका

## नाम फाउंडेशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिली जगण्याची उमेद; आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड / प्रतिनिधी

ज्येष्ठ अभिनेते आणि समाजसेवक नाना पाटेकर यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राच्या कला, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. आपल्या दमदार अभिनयाने भारतीय चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण करणारे आणि 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी भरीव सामाजिक कार्य उभे करणारे नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त मनाला चटका लावणारे आहे. त्यांचे जाणे हे केवळ कला आणि सामाजिक क्षेत्राचे नुकसान नसून, माझ्यासाठी एका ज्येष्ठ मार्गदर्शकाचे छत्र हरपल्यासारखे दुःख आहे, अशा शब्दांत विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांनी श्रद्धांजली वाहिली.

मातीशी घट्ट नाळ असलेले हळवे व्यक्तिमत्त्व

नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करताना आमदार गोरखे म्हणाले की, 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी दुष्काळग्रस्त भागात जलसंधारण, शेतकरी मदत आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आधार देण्याचे काम केले. केवळ सहानुभूती व्यक्त न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून त्यांनी गरजू कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घेतली. त्यांच्या या कार्यातून समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि माणुसकीची जाणीव प्रकर्षाने दिसून आली.

पडद्यावर करारी, निडर आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले नाना पाटेकर प्रत्यक्ष आयुष्यात मात्र मातीची वेदना जाणणारे आणि सामान्य माणसाशी घट्ट नाळ जोडलेले अत्यंत हळवे व्यक्तिमत्त्व होते. अभिनयाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही त्यांचे पाय कायम मातीशी जोडलेले राहिले.

माझ्यासाठी कायम दीपस्तंभासारखे

माझे आणि नानांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. सामाजिक प्रश्न, लोककल्याणकारी उपक्रम आणि विधायक कामांविषयी चर्चा होत असताना त्यांचे मार्गदर्शन नेहमीच नवी ऊर्जा देणारे ठरले. त्यांचा स्पष्टवक्तेपणा, सामाजिक कार्यातील निस्वार्थी तळमळ आणि माणसांविषयीचे प्रेम माझ्यासाठी कायम दीपस्तंभासारखे राहील.

आज नाना आपल्यात नाहीत, यावर मन विश्वास ठेवायला तयार नाही. त्यांनी आपल्या कर्तृत्वातून निर्माण केलेली प्रेरणा आणि समाजासाठी केलेले काम मात्र कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे, अशी भावना आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केली.

नाना पाटेकर यांनी कलाक्षेत्रात आपल्या अभिनयाचा अमीट ठसा उमटवतानाच सामाजिक कार्यातूनही समाजासमोर सेवाभावाचा आदर्श ठेवला. त्यांनी दाखविलेला माणुसकीचा आणि सामाजिक बांधिलकीचा मार्ग पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

नाना पाटेकर यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबीयांसह 'नाम फाउंडेशन'च्या सहकाऱ्यांना व तमाम महाराष्ट्राला हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, अशी प्रार्थना आमदार अमित गोरखे यांनी शोकसंदेशात केली.

# भगवान भक्तीगड की नारायणगड? दसऱ्याच्या गर्दीतून शक्तिप्रदर्शनाचा फैसला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकीय दसरा मेळाव्यांच्या परंपरेत बीड जिल्ह्यातील गडांनी गेल्या काही वर्षांत स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. यंदा भगवान भक्तीगड आणि नारायणगडावरील मेळाव्यांमधून राजकीय शक्तिप्रदर्शनाची चुरस रंगणार असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष या दोन्ही गडांकडे लागले आहे.

दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी भगवान गडावर सुरू केलेल्या दसरा मेळाव्याला मोठी लोकप्रियता मिळाली. त्यांच्या निधनानंतर गडावर राजकीय कार्यक्रमांना विराम देण्यात आला. त्यानंतर पंकजा मुंडे यांनी सावरगाव येथे भगवान भक्तीगड उभारून दसरा मेळाव्याची परंपरा कायम ठेवली. दुसरीकडे, नारायणगडावरील मेळाव्यालाही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीमुळे यंदाच्या मेळाव्याला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे दोन्ही गडांवरील गर्दी केवळ भक्तीचे दर्शन घडवणार की राजकीय ताकदीचेही मोजमाप करणार, हा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे.

कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी भगवान भक्तीगड आणि नारायणगडाची पाहणी करून सुरक्षा, वाहतूक आणि वाहनतळ व्यवस्थेचा आढावा घेतला. यंदा गर्दीचे गणितच दोन्ही गडांच्या राजकीय प्रभावाची नवी मोजपट्टी ठरण्याची शक्यता आहे.

# 'ज्ञानेश कुमारांना हटवा, देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा'; सपकाळांचा थेट हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

निवडणूक आयोग आणि एसआयआरच्या मुद्द्यावरून काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. ज्ञानेश कुमार यांची हकालपट्टी करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेसने राज्यभर 'लोकशाहीचा काळा दिवस' आंदोलन केले. बुलढाणा येथे झालेल्या आंदोलनात सपकाळ बोलत होते.



भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवडणूक आयोगाच्या मदतीने 'व्होटचोरी' केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. एसआयआरच्या मुद्द्यावर इंडिया आघाडीचे खासदार निवडणूक आयोगाला भेटण्याचा प्रयत्न करत असतानाही त्यांना भेट दिली जात नसल्याचा दावा त्यांनी केला.

विरोधकांवर पोलिसांकडून कारवाई होत असल्याचा आरोप करत सपकाळ यांनी केंद्र सरकारवर हुकूमशाहीचा आरोप केला. 'ज्ञानेश हटाव, लोकशाही बचाव' या घोषणेखाली आंदोलन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थांवर भाजपने कब्जा केल्याचा आरोपही त्यांनी केला. ज्ञानेश कुमार यांची हकालपट्टी झाली नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा सपकाळ यांनी दिला.

# अवसरी बुद्रुकच्या वाघदरा पाझर तलावाला नाना पाटेकर यांचे नाव

## जलसंधारणाच्या कामातून गावाच्या पाणीप्रश्नाला मिळाले बळ; ग्रामपंचायत व ग्रामस्थांचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

नाम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या माध्यमातून अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) ग्रामपंचायत हद्दीत सुमारे दीड कोटी रुपयांची जलसंधारणाची विविध कामे करण्यात आली. ओढे-नाले खोलीकरण, पाझर तलावांचे खोलीकरण तसेच पाणीसाठा वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या या कामांमुळे गावातील जलसाठ्यात वाढ होऊन शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेला मोठा हातभार लागल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.



नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत अवसरी बुद्रुक ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्या कार्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ग्रामीण भागातील जलसंधारणाच्या माध्यमातून पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान गावासाठी कायम स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

नाम फाउंडेशनच्या माध्यमातून अवसरी बुद्रुक परिसरात ओढे-नाले खोलीकरण, पाझर तलाव खोलीकरण आदी कामे करण्यात आली. पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यास या कामांचा उपयोग झाला. त्यामुळे भूजलपातळीत वाढ होण्याबरोबरच विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीसाठ्यातही सुधारणा झाल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले.

दरम्यान, नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याची आठवण कायमस्वरूपी जपण्यासाठी वाघदरा येथील पाझर तलावाचे नामकरण 'नाना पाटेकर वाघदरा पाझर तलाव' असे करण्याचा निर्णय ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी घेतला आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून गावाच्या पाणीप्रश्नाला हातभार लावणाऱ्या त्यांच्या योगदानाची ही आगळी मानवंदना ठरणार आहे.

ग्रामपंचायतीचे उपसरपंच अनिल हिंगे पाटील म्हणाले, नाना पाटेकर यांच्या माध्यमातून गावात झालेली जलसंधारणाची कामे अत्यंत मोलाची आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे अवसरी बुद्रुकच्या पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यांच्या कार्याची कायम आठवण राहावी, यासाठी वाघदरा पाझर तलावाला त्यांचे नाव देण्याचा निर्णय ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी घेतला आहे.

जलसंधारणातून गावाच्या भवितव्याला बळ

या कामांमुळे अवसरी बुद्रुक परिसरातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत झाली असून, त्याचा शेतीसाठीही सकारात्मक परिणाम झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सामाजिक बांधिलकीतून झालेल्या जलसंधारणाच्या कामाची आठवण पुढील पिढ्यांपर्यंत राहावी, या उद्देशाने पाझर तलावाला नाना पाटेकर यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# 'देशात अघोषित आणीबाणीसदृश स्थिती'; उल्हास बापटांचा केंद्रावर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

देशातील लोकशाही व्यवस्था संसदीय पद्धतीकडून पंतप्रधानकेंद्रित व्यवस्थेकडे झुकत असून, सध्या अघोषित आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचा गंभीर दावा ज्येष्ठ राज्यघटना अभ्यासक डॉ. उल्हास बापट यांनी केला.

पुण्यात काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वतीने 'निवडणूक आयोगावर गुन्हा दाखल न करण्याचे संरक्षण योग्य आहे का?' या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते.



निवडणूक आयोगावर सत्ताधाऱ्यांचा दबाव इंदिरा गांधी यांच्या काळापासून असल्याचे सांगत, सध्याच्या केंद्र सरकारच्या काळात हा दबाव टोकाला पोहोचल्याचा आरोप बापट यांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मतदानाचा अधिकार आणि निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व लक्षात घेऊन संविधानात निवडणुकांसाठी स्वतंत्र तरतुदी केल्या. घटना समितीतील चर्चेतही भविष्यात पंतप्रधानांकडून निवडणूक आयोगाच्या नियुक्त्यांमध्ये मनमानी होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती, असे बापट यांनी सांगितले.

हीच भीती आज प्रत्यक्षात उतरत असल्याचा दावा त्यांनी केला.

या परिसंवादाला ज्येष्ठ नेते उल्हास पवार, कायदेतज्ज्ञ डॉ. असीम सरोदे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरून देशात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर बापट यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगण्याची शक्यता आहे.

# दिल्ली-एनसीआरमधील बलात्कारांच्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाचा दणका; शाळांभोवती गस्त, कॅबचालकांची कठोर तपासणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

दिल्ली-एनसीआरमध्ये लैंगिक अत्याचारांच्या घटनांची मालिका सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींवर गंभीर प्रश्न उपस्थित करत व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे आदेश दिले आहेत. २८ सप्टेंबर रोजी या घटनांची स्वयंस्फूर्त दखल घेतल्यानंतर न्यायालयाने गुरुवारी, ८ ऑक्टोबर रोजी शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात वाढीव पोलिस गस्त, सार्वजनिक वाहतूक आणि ॲपआधारित कॅबचालकांची कठोर पडताळणी यासह अनेक निर्देश दिले.

न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने विद्यमान 'अँटी-ईव्ह-टीझिंग' पथके आणि इतर सुरक्षा प्रोटोकॉल अस्तित्वात असूनही सार्वजनिक ठिकाणी लैंगिक गुन्ह्यांची पुनरावृत्ती होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. हे नियम प्रत्यक्षात सातत्याने, प्रभावी देखरेखीखाली आणि निश्चित जबाबदारीने लागू केले जात आहेत का, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.

न्यायालयाने वाहनांच्या जीपीएस आणि ट्रॅकिंग यंत्रणांसह एसओएस प्रणालीचे रिअल-टाइम निरीक्षण, कॅब व सार्वजनिक वाहतूक



चालकांची काटेकोर पडताळणी आणि शैक्षणिक संस्थांच्या आसपास पोलिसांची उपस्थिती वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करून मद्यविक्री करणाऱ्या आस्थापनांवरही कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, दिल्लीचे मुख्य सचिव आणि पोलिस आयुक्त यांना या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत नियमित अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कोणतीही गंभीर त्रुटी आढळल्यास हे दोन्ही अधिकारी वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जातील, असा स्पष्ट इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

आता खरी कसोटी आदेशांची नाही, तर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, याची आहे. सुरक्षा प्रोटोकॉल कागदावर असणे पुरेसे नाही; महिलांना आणि मुलींना सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळणे हेच प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे खरे मोजमाप ठरणार आहे.

## सारांश वृत्त

### 'एसआयआर रद्द करा'; ज्ञानेश कुमारांविरोधात बेंगळुरूत संतापाचा उद्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र
बेंगळुरू । वृत्तसंस्था

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (एसआयआर) प्रक्रियेवरून बेंगळुरूत निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलनाला धार आली आहे. 'कॉकरोच जनता पार्टी'ने गुरुवारी फ्रीडम पार्क येथे आंदोलन करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

'एसआयआर रद्द करा' आणि 'ज्ञानेश कुमार, पद सोडा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनात अभिनेते प्रकाश राज आणि युट्युबर ध्रुव राठी सहभागी झाले.

प्रकाश राज यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत एसआयआरमुळे मतदानाचा अधिकार धोक्यात आल्याचा दावा केला. सरकार कोण बनवायचे हे ठरवण्याचा अधिकार जनतेचा आहे; मात्र मतदार कोण राहणार, हे ठरवण्याची प्रक्रिया सरकारच्या नियंत्रणात जाणे धोकादायक असल्याचे ते म्हणाले.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी मतदार यादीतून नावे वगळण्यात आलेल्या नागरिकांचे अनुभव मांडण्यासाठी 'जन-न्यायालय' भरवले. अनेक नागरिकांना प्रत्यक्षात त्याच ठिकाणी राहत असूनही 'स्थलांतरित' किंवा 'अनुपस्थित' दाखवण्यात आल्याचा दावा करण्यात आला.

ध्रुव राठी यांनीही कर्नाटकातील काही मतदान केंद्रांवरील कथित अनियमिततेचा मुद्दा उपस्थित केला. आंदोलनानंतर महिला पत्रकारांच्या समर्थनार्थ 'चप्पल आंदोलन' करण्याची घोषणा करण्यात आली.

# मुलांच्या सुरक्षेवर मेटाचा 'एआय' दावा; ५३ लाख कंटेंटवर कारवाई, तरी बाल लैंगिक शोषणाचा धोका कायम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीचा सुळसुळाट रोखण्यात अपयश आल्याच्या आरोपांनंतर मेटाने आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अशा बेकायदेशीर सामग्रीचा शोध घेण्याची यंत्रणा अधिक सक्षम केल्याचा दावा केला आहे. भारत सरकारकडून कायदेशीर चौकशी आणि तीव्र टीका झाल्यानंतर मेटाने हे पाऊल उचलले आहे. मात्र, प्रश्न इतकाच आहे की, जगातील सर्वात मोठ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या कंपनीला ही समस्या इतकी गंभीर होईपर्यंत थांबावे का लागले?

मेटाच्या माहितीनुसार, जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांत भारतात फेसबुक आणि इन्स्टाग्रामवरील बाल लैंगिक शोषणाशी संबंधित तब्बल ५३ लाख सामग्रीवर कारवाई करण्यात आली. हा आकडा धक्कादायक आहे. कारण ही केवळ कारवाईची संख्या नसून डिजिटल प्लॅटफॉर्मवर मुलांच्या सुरक्षेसमोर उभ्या असलेल्या संकटाची व्याप्तीही दाखवतो. मेटाने आता नव्या लार्ज लँग्वेज मॉडेल्सच्या माध्यमातून सीएसएएम अर्थात बाल लैंगिक शोषण सामग्री शोधण्याची यंत्रणा, जाहिरातींमध्ये अधिक पारदर्शकता, जाहिरातींच्या सामग्रीची एआयच्या माध्यमातून तपासणी आणि प्लॅटफॉर्मच्या सुरक्षेतील त्रुटी शोधण्यासाठी 'रेड-टीमिंग' एआय एजंट वापरण्याची घोषणा केली आहे. याशिवाय, एखादे संशयित खाते हटवल्यानंतर त्याच व्यक्तीने नव्या नावाने पुन्हा खाते तयार केल्यास ते शोधण्यावरही भर दिला जाणार आहे.

काही आठवड्यांपूर्वी मेटाने सीएसएएमशी संबंधित अहवाल भारतीय कायदा अंमलबजावणी यंत्रणांना देण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, तंत्रज्ञान कितीही अत्याधुनिक झाले तरी प्रश्न राहतोच मुलांच्या सुरक्षेसाठी कंपन्या आधीच पुरेसे प्रयत्न करत होत्या का, की सरकारी दबाव आणि कायदेशीर चौकशीनंतरच एआयची आठवण झाली? ५३ लाख सामग्रीवर कारवाई हा मेटाच्या यंत्रणेच्या क्षमतेचा पुरावा आहे की समस्येच्या भयावह प्रमाणाचा? सोशल मीडिया कंपन्यांसाठी हा केवळ तांत्रिक प्रश्न नसून मुलांच्या सुरक्षिततेचा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या जबाबदारीचा थेट प्रश्न आहे.

# पीएसीएल घोटाळ्यात ईडीचा मोठा वार; महाराष्ट्रातील ५६७ कोटींच्या मालमत्तांवर टाच, पण हजारो कोटींचे नुकसान भरून निघणार कसे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

पीएसीएल प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहारावर कारवाई करत अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) महाराष्ट्रातील तब्बल ५६७.४५ कोटी किमतीच्या ४८ स्थावर मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या आहेत. पुणे, मुंबई आणि रायगड येथील या मालमत्ता आरोपी प्रतीक कुमार, त्याचा मुलगा अंश तसेच बीमिंग इन्फ्राडेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, गणराज प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड आणि ग्रीनफिल्ड इस्टेट्स लिमिटेड यांच्या नावावर असल्याचे ईडीने गुरुवारी सांगितले.



या कारवाईमुळे पीएसीएल प्रकरणात भारतासह परदेशात आतापर्यंत जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांची एकूण किंमत तब्बल ३०,२३५.२१ कोटींवर पोहोचली आहे. म्हणजेच ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित कारवाई नसून देशातील सर्वात मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांपैकी एका प्रकरणातील मालमत्ता शोधण्याच्या आणि जप्त करण्याच्या तपासाची व्यापकता स्पष्ट होते.

ईडीचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) नोंदवलेल्या गुन्ह्यावर आणि ३३ आरोपींविरोधात दाखल केलेल्या आरोपपत्रांवर आधारित आहे. तपास यंत्रणांच्या मते, गुंतवणूकदारांकडून उभारलेल्या मोठ्या आर्थिक रकमेच्या व्यवहारांशी संबंधित गैरव्यवहाराचा तपास या प्रकरणात सुरू आहे.

मात्र, इथे सर्वात मोठा प्रश्न आहे मालमत्ता जप्त झाल्या, पण गुंतवणूकदारांचे पैसे परत कधी मिळणार? हजारो कोटींच्या मालमत्ता जप्त करूनही जर सामान्य गुंतवणूकदार वर्षानुवर्षे आपल्या पैशांच्या प्रतीक्षेत राहणार असतील, तर अशा कारवाईचा अंतिम लाभ कोणाला मिळणार?

३०,२३५ कोटींची मालमत्ता जप्त झाल्याचा आकडा मोठा असला, तरी न्यायालयीन प्रक्रिया, मालमत्तांचे अंतिम अधिग्रहण आणि गुंतवणूकदारांना प्रत्यक्ष परतावा हेच या तपासाचे खरे मोजमाप ठरणार आहे. घोषणांपेक्षा आता गरज आहे ती पैसा कुठे गेला, कोणाकडे गेला आणि तो सामान्य गुंतवणूकदारांपर्यंत कधी पोहोचणार, याची स्पष्ट उत्तरांची.

# सौदी अरेबियातील दोन विमानतळांवर हल्ले; भारताचा तीव्र निषेध, नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे 'अस्वीकार्य'

■ दैनिक राज्य लोकतंत्र
न्यूयॉर्क : वृत्तसंस्था

सौदी अरेबियातील अभा आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि रियाधमधील किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या अलीकडील हल्ल्यांचा भारताने गुरुवारी, ८ ऑक्टोबर २०२६ रोजी तीव्र निषेध केला. नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने (चएअ) निवेदनातून स्पष्ट केले.

गेल्या दोन दिवसांत झालेल्या या हल्ल्यांमध्ये नागरिकांचा मृत्यू आणि काही जण जखमी झाल्याचे भारताने नमूद केले. सौदी अरेबियाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हल्ल्यांमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला आहे. हे हल्ले येमेनमधील हौथी बंडखोरांनी केल्याचे सौदी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सौदी अरेबियातील महत्त्वाच्या नागरी विमानतळांना लक्ष्य




केल्याने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विमानतळांसारख्या नागरी सुविधांवर होणारे हल्ले केवळ प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण करत नाहीत, तर हवाई वाहतूक आणि व्यापक नागरी व्यवस्थेवरही परिणाम करू शकतात.

भारताने अशा हल्ल्यांबाबत स्पष्ट भूमिका घेत नागरी पायाभूत सुविधांचे संरक्षण आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. मध्यपूर्वेतील संघर्ष अधिक चिघळू नये आणि त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर होऊ नये, हीच या भूमिकेची प्रमुख पार्श्वभूमी आहे.

# 'ईडीने खासगी मालमत्ता वादात ताकद खर्च करू नये'; मद्रास उच्च न्यायालयाचा थेट सवाल, सार्वजनिक पैशांच्या घोटाळ्यांना प्राधान्य देण्याचा सल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली: ।प्रतिनिधी

चेन्नई : अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) अधिकारांच्या वापराबाबत मद्रास उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सार्वजनिक पैसा, भ्रष्टाचार, जनहित आणि राष्ट्रीय पातळीवरील घोटाळ्यांच्या प्रकरणांना प्राधान्य देण्याचा सल्ला दिला आहे. खासगी व्यक्तींमधील मालमत्ता किंवा आर्थिक वादांसाठी मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) कठोर तरतुदींचा वापर करण्याबाबत न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला.

न्यायमूर्ती एन. रमेश यांनी स्पष्ट केले की, ईडीची संसाधने अमर्यादित नाहीत. त्यामुळे अटक करण्यासारख्या कठोर अधिकारांचा वापर करताना कोणत्या प्रकरणांना प्राधान्य द्यायचे, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, या निरीक्षणाचा अर्थ संबंधित तपास बंद करण्याचा आदेश असा नाही. मात्र, ईडीने आपल्या शक्तीचा वापर कोणत्या प्रकारच्या प्रकरणांत करावा, याबाबत संस्थात्मक प्राधान्यक्रम निश्चित करणे आवश्यक आहे, असे न्यायालयाच्या निरीक्षणातून स्पष्ट होते.

हे निरीक्षण अला अलगप्पन विरुद्ध अतिरिक्त संचालक या प्रकरणातील जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान करण्यात आले. या प्रकरणात ईडीने पीएमएलएअंतर्गत मनी लाँडरिंगचा आरोप केला होता. मूळ गुन्हा २९ सप्टेंबर २०२३ रोजी भारतीय दंड संहितेतील कलम ४०९, ४२०, ५०६(१), १२०-ब आणि ३४ अंतर्गत दाखल करण्यात आला होता. तक्रारदार महिलेने दिलेल्या पॉवर ऑफ अटर्नीचा गैरवापर करून तिच्या मालमत्तेशी व्यवहार करण्यात आल्याचा आणि तिचे पैसे आरोपींच्या खात्यांकडे वळवण्यात आल्याचा आरोप होता.

आरोपीविरोधातील आरोपांमध्ये ४.५० लाखांची एका बांधकाम कंपनीकडून त्याच्या खात्यात झालेली जमा, तक्रारदाराच्या पैशातून फ्लॅट खरेदी, कृषी जमीन हस्तांतरण आणि संबंधित आर्थिक व्यवहारांचा समावेश होता. आरोपीने स्वतःवर आरोप असलेली मनी लाँडरिंगची रक्कम १ कोटींपेक्षा कमी असल्याचा युक्तिवाद केला. मात्र, पीएमएलएच्या कलम ४५ अंतर्गत १ कोटींची मर्यादा ठरवताना केवळ आरोपीच्या वैयक्तिक खात्यातील रक्कम नव्हे, तर सहआरोपींसह कथितरीत्या मनी लाँडरिंग केलेली संयुक्त रक्कम विचारात घेतली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

मात्र, व्यवहारांचा विचार केल्यानंतर न्यायालयाला आरोपीच्या ताब्यातील मालमत्ता अनुसूचित गुन्ह्यातून मिळालेल्या पैशातूनच आली असल्याचे किंवा आरोपीला त्या व्यवहारांच्या स्वरूपाची जाणीव होती, हे स्पष्ट करणारे पुरेसे साहित्य ईडीच्या बाजूने दिसले नाही. त्यामुळे न्यायालयाने आरोपीला जामीन देण्यास अनुकूलता दर्शवली.

याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने पीएमएलए हा गंभीर गुन्ह्यांतून निर्माण झालेल्या पैशांच्या गैरव्यवहारावर कारवाई करण्यासाठीचा कठोर कायदा आहे, याची आठवण करून दिली. अशा गुन्ह्यांचा परिणाम आर्थिक व्यवस्थेवर आणि राष्ट्रीय हितावर होऊ शकतो. मात्र, या प्रकरणात ईडीच्या स्वतःच्या म्हणण्यानुसार व्यवहार एका व्यक्ती आणि तिने नियुक्त केलेल्या पॉवर एजंटच्या कुटुंबातील खासगी व्यवहारांपुरते मर्यादित होते आणि त्यात सार्वजनिक पैसा गुंतलेला नव्हता.

यामुळे न्यायालयाचा सवाल केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित राहत नाही. ईडीसारख्या केंद्रीय तपास यंत्रणेची अमर्यादित नसलेली संसाधने नेमकी कुठे वापरली जातात? सार्वजनिक पैशांची लूट, मोठे आर्थिक घोटाळे आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांपेक्षा खासगी मालमत्ता वादांना कठोर पीएमएलएची चौकट लागू करणे कितपत योग्य? हा प्रश्न न्यायालयाच्या निरीक्षणामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

ईडीच्या अधिकारांवर न्यायालयाने थेट मर्यादा घातलेली नसली, तरी तपास यंत्रणेच्या शक्तीचा वापर प्रमाणबद्ध, प्राधान्यक्रमाधारित आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन व्हावा, असा स्पष्ट संदेश या निरीक्षणातून मिळतो.

# धीरूभाई अंबानींच्या 'तिसऱ्या पुत्रा'वर अमित शहा यांच्या ईडीचा घाव! अलिबागची ८८.४७ एकर जमीन जप्त; ३३६ कोटींच्या मालमत्तेमागे २,४३४ कोटींच्या निधीचा संशय

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई :प्रतिनिधी

धीरुभाई अंबानी यांचे विश्वासू सहकारी आणि रिलायन्स समूहातील प्रभावशाली व्यक्ती म्हणून दीर्घकाळ चर्चेत राहिलेले आनंद जैन आता अंमलबजावणी संचालनालयाच्या अर्थात ईडीच्या मनी लॉन्डरिंग तपासाच्या केंद्रस्थानी आले आहेत. ईडीने आनंद जैन यांच्याशी संबंधित जय कॉर्प लिमिटेड आणि अन्य संस्थांविरोधातील प्रकरणात अलिबागमधील तब्बल ८८.४७ एकर जमीन तात्पुरती जप्त केली आहे. या जमिनीची सध्याची बाजारमूल्य तब्बल ३३६ कोटी असल्याचे ईडीने म्हटले आहे. कारवाई प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग ॲक्ट, २००२ अंतर्गत करण्यात आली आहे.

पण या कारवाईची खरी कहाणी केवळ ८८ एकर जमिनीपुरती मर्यादित नाही. तिची मुळे तब्बल २,४३४ कोटींच्या अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर व्हेंचर कॅपिटल फंडमध्ये - यूआयव्हीसीएफ आहेत. जय कॉर्पने २००६-०७ मध्ये हा निधी सुरू केला आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका तसेच वित्तीय संस्थांसह विविध गुंतवणूकदारांकडून सुमारे २,४३४ कोटी उभे केले. ही रक्कम देशभरातील स्थावर मालमत्ता प्रकल्पांसाठी विविध विशेष उद्देश वाहनांमध्ये - एसपीव्ही गुंतवण्यात आली.

ईडीच्या आरोपानुसार, निधीची मुदत सेबीची आवश्यक मंजुरी न घेता निर्धारित मर्यादेपेक्षा पुढे वाढवण्यात आली. त्यानंतर सेबीने निधी बंद करण्याचे निर्देश दिले आणि गुंतवणूकदारांना बाहेर पडण्यासाठी एसपीव्हींमधील मालमत्तांचे स्वतंत्र मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले. इथेच तपासाचा सर्वात गंभीर भाग समोर येतो. ईडीच्या म्हणण्यानुसार, यूआयव्हीसीएफच्या व्यवस्थापनाच्या कथित संगनमताने एसपीव्हींमधील निधीच्या हिस्स्याचे मूल्य कमी करून ते केवळ २६९.२० कोटी दाखवण्यात आले. त्यामुळे गुंतवणूकदारांना कमी मूल्यावर बाहेर पडण्याची संधी मिळाली, असा ईडीचा आरोप आहे.

यानंतर निधीमधील उर्वरित युनिट्स जय कॉर्पच्या प्रवर्तकांशी संबंधित पाच संस्थांनी कथितरीत्या कमी किमतीत ताब्यात घेतल्याचा आरोप ईडीने केला आहे. या कथित व्यवहारातून सुमारे २३० कोटींची 'गुन्ह्यातून मिळालेली रक्कम' निर्माण झाल्याचा दावा तपास यंत्रणेचा आहे.

या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा म्हणजे नीलकंठ टाउनशिप अँड कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड. यूआयव्हीसीएफने या एसपीव्हीमध्ये सुमारे ५१ कोटींची गुंतवणूक केली होती आणि त्यातून अलिबागमधील जमीन खरेदी करण्यात आली. ईडीच्या आरोपानुसार या एसपीव्हीमधील निधीच्या हिस्स्याचे वास्तविक बाजारमूल्य कमी दाखवण्यात आले आणि त्यानंतर प्रवर्तकांशी संबंधित पाच संस्थांनी तो हिस्सा कथितरीत्या कमी किमतीत मिळवला.

या प्रकरणात ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी संबंधित स्थावर मालमत्तेचे मूल्य २३० कोटी होते, असे ईडीने म्हटले आहे. मात्र आज त्याच जमिनीचे बाजारमूल्य सुमारे ३३६ कोटी असल्याचे तपास यंत्रणेचे म्हणणे आहे. म्हणजेच जप्तीच्या कारवाईने केवळ भूतकाळातील व्यवहारच नाही, तर त्या मालमत्तेच्या सध्याच्या प्रचंड मूल्याकडेही लक्ष वेधले आहे.

इतकेच नाही. या प्रकरणातील आधीच्या ईडीच्या झडतीत सुमारे १.८६ कोटी रोख जप्त करण्यात आले होते, तर डिमॅट खाती आणि म्युच्युअल फंडांमधील ९९.४७ कोटींची मालमत्ता गोठवण्यात आली होती. तपास अद्याप सुरू आहे.

या कारवाईची सुरुवातही महत्त्वाची आहे. ३१ जानेवारी २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेने, मुंबईने प्रथम माहिती अहवाल दाखल केला. त्याच प्रथम माहिती अहवालाच्या आधारे ईडीने मनी लॉन्डरिंगचा तपास सुरू केला. जय कॉर्प लिमिटेड, अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर व्हेंचर कॅपिटल लिमिटेड, अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टीज लिमिटेड आणि अन्य संबंधित घटक तपासाच्या कक्षेत आहेत.

आनंद जैन यांचा अंबानी कुटुंबाशी संबंधही या प्रकरणाला वेगळे वजन देतो. जैन यांना धीरुभाई अंबानींचा तिसरा मुलगा म्हणून संबोधले जात असे. ते मुकेश आणि अनिल अंबानींचे शाळेपासूनचे सहकारी होते आणि १९८६ मध्ये धीरुभाईंनी त्यांना शेअर बाजारातील 'बेअर कार्टेल'विरोधात महत्त्वाची भूमिका दिली होती.

म्हणूनच आता प्रश्न फक्त ८८.४७ एकर आणि ३३६ कोटींच्या जमिनीचा नाही. प्रश्न आहे २,४३४ कोटींच्या निधीचा, २६९.२० कोटींच्या कथित कमी मूल्यांकनाचा, २३० कोटींच्या कथित 'गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेचा', १.८६ कोटींच्या रोख रकमेचा आणि ९९.४७ कोटींच्या गोठवलेल्या मालमत्तेचा. ईडीचे आरोप न्यायालयीन प्रक्रियेत सिद्ध होणे बाकी आहे; मात्र या तपासातून पुढे नेमके कोणते आर्थिक व्यवहार, कोणत्या संस्था आणि कोणते जबाबदार व्यक्ती उघडकीस येतात, याकडे आता उद्योगविश्वासह सर्वांचे लक्ष लागले आहे.